**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील अभ्यासिकेचे कुलगुरूंचे हस्ते उद्घाटन

अमरावती - (दि. २४.०६.२०२२)

ज्ञानाची निर्मिती करणे आणि ज्ञानाचा प्रसार व जतन करणे तसेच संशोधन, अध्यापन, शिक्षण या कार्यासोबतच विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे हे विद्यापीठाचे कार्य असून कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त सुविधा मिळाव्यात, विशेषतः अभ्यासिकेच्या सुविधा त्यांना दिल्या जाव्यात, याकरिता विद्यापीठ परिसरात अभ्यासिका निर्माण करण्यात आल्या आहेत. शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र (कासू) येथे निसर्गरम्य वातावरणात नव्याने अभ्यासिका सुरु करण्यात आली असून त्याचे फित कापून उद्घाटन आज कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे, सहा. ग्रंथपाल श्री विशाल बापटे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच ज्ञानस्रोत केंद्रातील कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यापीठात सात अभ्यासिका

विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरातील ज्ञानस्रोत केंद्रामध्ये चार अभ्यासिका, तसेच दोन अभ्यासिका ज्ञानस्रोत केंद्र इमारतीच्या बाहेर व एक अभ्यासिका कासू इमारत याठिकाणी २४ X ७ अशी सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसरातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसह संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि स्पर्धा परीक्षेची तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ह्या अभ्यासिका अतिशय उपयुक्त ठरत आहे.

कासू येथील अभ्यासिकेजवळ छोटे गार्डन लवकरच तयार होणार असून त्याठिकाणी सुद्धा विद्यार्थ्यांना ओपन रिडींगसह सुविधा उपलब्ध होईल. याशिवाय रात्री १२ वाजेपर्यंत उपहारगृहाची सुविधा सुद्धा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे निसर्गरम्य परिसरात विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता सर्व सोयी उपलब्ध होतील.

### कुलगुरूंनी केली घोषणेची पूर्तता

विद्यापीठाचे आठवे कुलगुरू म्हणून डॉ. दिलीप मालखेडे १६ सप्टेंबर, २०२१ रोजी विद्यापीठात रुजू झालेत. त्यावेळी विद्यार्थ्यांसाठी खूप कामे करण्याचा मानस त्यांनी भाषणातून बोलून दाखविला होता. याशिवाय विद्यापीठ परिसरात २४ X ७ तीन अभ्यासिका तयार करण्यात येईल, अशी घोषणा सुद्धा त्यांनी केली होती. त्या घोषणेची पूर्तता कुलगुरूंनी केली असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### विद्यार्थ्यांशी कुलगुरूंनी साधला संवाद

अभ्यासिकेचे उद्घाटन करतांना कुलगुरूंनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. अभ्यासिकेसोबतच पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील प्रयोगशाळा सुद्धा विद्यार्थ्यांसाठी खुल्या करण्यात येतील, अशी माहिती त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना दिली. या विद्यापीठाचा विद्यार्थी कुठल्याच क्षेत्रात मागे राहता कामा नये. या विद्यापीठाचा नावलौकिक त्याने देशात व जागतिक पातळीवर पोहोचवावा, अशी अपेक्षा चर्चेप्रसंगी त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थीप्रिय कुलगुरू असल्याच्या भावना याप्रसंगी विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्यात.

### अभ्यासिकेमध्ये शांत, प्रसन्न व सुरक्षित वातावरण

विद्यापीठ परिसरातील सर्व अभ्यासिकेमध्ये शांत व प्रसन्न वातावरण असून सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्यामुळे मुलांना विशेषतः मुलींना अभ्यास करतांना शांत वातावरणासह सुरक्षा सुद्धा मिळत आहे.

### विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेचा लाभ घ्यावा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये ज्ञानस्रोत केंद्राच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या अभ्यासिकेचा जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे यांनी केले आहे. याकरिता नाममात्र रू. २५०/- शुल्क सहा महिन्यांकरिता आकारले जात असून बसण्याची तसेच शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा सुद्धा अभ्यासिकेमध्ये करण्यात आली आहे. तरी जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, अशी विद्यापीठाकडून अपेक्षा आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. २४/०६/२०२२.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 149

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/